

# उदय प्रकाश

अनु.
भारती
गोरे

## डुक्कर सहा

डुकराने दूर जंगलात
निळ्याशार धबधब्याजवळ
एका सुंदर चिमणीला
बासरी वाजवताना ऐकलं होतं

त्यानं ऐकलं होतं
की हरणाची जोडी
एकांतात असते तेव्हा
तानपुऱ्याचे तार छेडते

एके दिवशी डुक्कर म्हणालं -
संगीत आणि कलेशिवाय
कोणतंही डुक्कर
जणू शेपटीविना आहे
कलेमध्ये डुकराने दक्ष असायलाच
हवे
आणि मग डुकराने मागवली
बासरी आणि मागवला तानपुरा

त्यानं मैफल जमवली
आणि तानपुऱ्याच्या तारांवर
घासू लागला
खुरं आणि दात

तानपुऱ्याच्या कैक तारा तुटल्या
कैक सैलावल्या

मग डुकरानं
बासरीत फुंकर मारली
बासरी आणि तानपुऱ्यावर
जेवढे म्हणून सूर उमटले
त्यांना ऐकून
बाकीच्या डुकरांनी
तल्लीन होऊन माना डोलावल्या

डुक्कर म्हणालं -
तर अशा प्रकारे कलेच्या इतिहासात
डुक्कर-संगीत निर्माण झालं

एके दिवशी डुक्कर फार उदास होतं
ते म्हणालं -
असं का होतं की
डुक्कर-संगीत वाजतं तेव्हा
फक्त डुकरंच माना डोलावतात
फक्त डुकरंच गुणगुणतात
फक्त डुकरंच स्मित करतात
डुक्कर-संगीत तर
कालातीत आणि वर्गातीत आहे
हा साक्षात परमेश्वर आहे
आणि प्रत्येक अभिजात संस्कारात
व्यापलेला आहे

जोवर दुसरे
जलचर, भूचर याला स्वीकारणार
नाहीत
तोवर डुक्कर-संगीताचं

---

अनुवादकर्त्या औरंगाबादस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात हिंदीच्या प्राध्यापक आहेत.
ईमेल- drbharatigore@gmail.com

साम्राज्य अखंड म्हणता येणार नाही

डुक्कर-संगीत
कलेचा चक्रवर्ती सम्राट आहे
डुक्कर म्हणालं -
सत्तेनं डुक्कर-संगीताचा
प्रचार - प्रसार करण्यासाठी
एकवटायला हवं

अशा प्रकारे
एके दिवशी
डुकराने
हरणाला
दरबारी बोलावलं

बोलावलं आणि हरणाला त्यानं
हरळीने भरलेल्या हिरव्यागार
मैदानात
पूर्णपणे स्वतंत्र होऊन
चरण्या-फिरण्याचं अभयदान दिलं

हरळी हळू हळू
हरणाच्या डोळ्यात भरली
हरणाच्या मेंदूकडे जाणाऱ्या
सर्व नसा-शिरांमध्ये
हरळीची हिरवळ
गस्त घालू लागली

आणि त्याच वेळी
डुकराने तानपुरा काढला
अन वाजवायला घेतला

हरणानं सुरुवातीला
हरळीच्या गहिऱ्या गंधात बुडून
वाह वाह केली

आह आह केली
मग हळू हळू त्याला
खरंच डुक्कर-संगीत आवडायला
लागलं
आवडायला लागलं
आणि हरीण
डुक्कर-संगीताच्या
द्रुत आणि विलम्बित
गाऊ लागलं

करता - करता एके दिवशी
असं झालं की
हरणासाठी
डुक्कर-संगीत म्हणजे
हरळीनं हिरवंगार झालेलं
मैदान बनलं

आणि मग होता होता
असं झालं की हरणाचे
सुंदर चंचल कान
डुकरासारखे झाले

अशा रितीने जेव्हा हरीण
एक दिवस पूर्णपणे
डुक्कर बनलं
तेव्हा डुकराने त्याला
डुक्कर-पीठाचा
सर्वोच्च कला पुरस्कार देऊन
सन्मानित केलं.

●

▶ १६ फेब्रुवारी २०१९च्या परिवर्तनाचा वाटसरूमध्ये उदय प्रकाश यांच्या डुक्कर या मालिकेतल्या या आधीच्या ५ कविता प्रसिद्ध झाल्या होत्या.